आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२४ जून २०२४ - सोमवार

ठळक बातम्या

- १८व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन आजपासून सुरू, खासदारांचे शपथविधी सुरू
- गव्हाचे दर स्थिर राखण्यासाठी केंद्र सरकारकडून गव्हाच्या साठवणुकीवर मर्यादा
- अतिसारामुळे होणारे बालमृत्यू रोखण्यासाठी केंद्र सरकारकडून विशेष मोहिमेला सुरुवात
- दक्षिण कोरियात बॅटरीच्या कंपनीला लागलेल्या आगीत २० जणांचा मृत्यू, २३ जण बेपत्ता

आणि

- टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या सुपर ८ मधल्या सामन्यात, नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाचं भारताला फलंदाजीसाठी पाचारण

<><><><><>

१८व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन आज सुरू झालं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात भर्तृहरी महताब यांना हंगामी सभापती म्हणून शपथ दिली. भर्तृहरी महताब यांनी संसदेच्या नवनिर्वाचित खासदारांना सभागृहाच्या सदस्यत्वाची शपथ दिली. त्यानंतर सर्व सदस्यांचा शपथविधी सुरू झाला. सभापतींनी सर्वप्रथम प्रधानमंत्री आणि वाराणसीचे खासदार नरेंद्र मोदी यांना शपथ दिली. सभापती निवडीपर्यंत लोकसभेचे कामकाज चालविण्यात मदत करण्यासाठी नियुक्त केलेल्या अध्यक्षांच्या तालिकेला शपथ देण्यात आली. भाजप खासदार

राधामोहन सिंग आणि फग्गन सिंग कुलस्ते यांनी तालिका सदस्य म्हणून शपथ घेतली.

मात्र, काँग्रेसचे खासदार के सुरेश, द्रमुकचे खासदार टी. आर. बाळू आणि टीएमसीचे सुदीप बंदोपाध्याय यांनी शपथ घेतली नाही. केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह, शिवराज सिंह चौहान, नितीन गडकरी यांच्यासह इतर मंत्र्यांनी सभागृहाच्या सदस्यत्वाची शपथ घेतली.

पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ, जळगावच्या खासदार रक्षा खडसे, केंद्रीय राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी मराठीतून शपथ घेतली. इतर अनेक खासदारांनी त्यांच्या मातृभाषेत आणि आणि इतर प्रादेशिक भाषांमध्ये शपथ घेतली. उर्वरित खासदारांचे शपथविधी उद्या होणार आहेत.

येत्या बुधवारी २६ जूनला नवीन लोकसभा सभापतींची निवड होणार आहे. राज्यसभेचं अधिवेशन येत्या गुरुवारी २७ जूनला सुरु होणार असून त्याच दिवशी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं अभिभाषण होईल. अधिवेशन ३ जुलैपर्यंत चालेल.

दरम्यान, भाजपा अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांची राज्यसभेच्या सभागृहनेतेपदी निवड करण्यात आली आहे.

<><><><><>

एकशे चाळीस कोटी भारतीयांचं जीवनमान सुधारणं हीच रालोआ सरकारच्या लेखी खरी सुधारणा असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. समाजमाध्यमावर आज त्यांनी प्रकाशित केलेल्या मजकुरात लिहीलं आहे की, वस्तू आणि सेवा कर प्रणालीची अंमलबजावणी केल्यापासून अनेक गृहोपयोगी वस्तू

स्वस्त झाल्या असून सामान्य माणसाच्या बचतीत भर पडली आहे. देशवासियांच्या जीवनमानात सुधारणा घडवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

इंडिया आघाडीच्या खासदारांनी आज लोकसभेत संविधानाची प्रत घेऊन प्रवेश केला. काँग्रेस, नेते मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी, राहुल गांधी, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, द्रमुकचे टी आर बालू यांच्यासह अनेक सदस्यांनी घोषणाबाजी केली. समाजवादी पार्टीचे अखिलेश यादव यांच्यासह इतर खासदारही संविधानाची प्रत घेऊन सभागृहात आले होते.

नीट परीक्षेतली कथित अनियमितता, पश्चिम बंगालमधला रेल्वे अपघात या मुद्यांवरून काँग्रेसने सरकारवर टीका केली आहे. या मुद्द्यांवर सरकार गप्प का? असा सवाल काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी संसदेच्या आवारात प्रसारमाध्यमांशी बोलताना केला.

<><><><><>

गव्हाचे दर स्थिर राखण्याच्या दृष्टीनं साठेबाजी रोखण्याकरता केंद्र सरकारनं गव्हाच्या साठवणुकीवर मर्यादा घातल्या आहेत. केंद्रीय अन्न आणि सार्वजनिक वितरण सचिव संजीव चोप्रा यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. त्यानुसार व्यापारी आणि घाऊक विक्रेत्यांसाठी ही मर्यादा ३ हजार टन, किरकोळ विक्रेत्यांसाठी १० टन, तर मोठ्या साखळी समूहांच्या प्रत्येक दुकानाकरता १० टन आणि त्यांच्या आगारांकरता ३ हजार टन इतकी आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत ती लागू राहील. गव्हाचे दर स्थिर रहावेत यासाठी सरकार गरजेनुसार या साठा मर्यादेचा आढावा घेईल, असं चोप्रा म्हणाले.

गव्हाचा तुटवडा असल्याचं वृत्त त्यांनी फेटाळलं. देशात कुठेही तुटवडा नसून गव्हाचे दर स्थिर आहेत. ते स्थिर रहावेत यासाठी सरकारपुढं सर्व पर्याय खुले आहेत. साठवणुकीवरची मर्यादा हा एक उपाय आहे, तो केला आहे, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा यांनी आज अतिसार निर्मूलन मोहिमेची सुरुवात केली. अतिसारामुळे होणारे बालमृत्यू थांबवणं हा या मोहिमेचा हेतू आहे. दोन महिने चालणाऱ्या या मोहिमेत पाच वर्षांखालच्या बालकांना ओआरएस आणि झिंकची पाकिटं देण्यात येणार आहेत. जलजीवन मिशन, स्वच्छ भारत अभियान आणि आयुष्मान आरोग्य मंदिर नेटवर्क यासारख्या उपक्रमांमुळे अतिसारामुळे होणाऱ्या बालमृत्यूचं प्रमाण कमी झाल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांनी सांगितलं. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री अनुप्रिया पटेल आणि प्रतापराव जाधव उपस्थित होते.

<><><><><>

नीट परीक्षा घोटाळ्यात लातूरमध्ये अटकेत असलेल्या एका आरोपीला न्यायालयानं २ जुलैपर्यंत पोलीस कोठडी ठोठावली आहे. याप्रकरणी ४ जणांविरोधात दहशतवाद विरोधी पथकानं गुन्हा दाखल केला आहे. यातल्या एकाला पोलिसांनी काल अटक केली होती. इतर दोघांची चौकशी सुरू आहे आणि दिल्लीतल्या चौथ्या आरोपीच्या अटकेसाठी पोलिस पथक जाणार आहे, अशी माहिती सुत्रांनी दिली.

<><><><><>

NEET परीक्षेतील कथित गैरप्रकारांची चौकशी करण्यासाठी केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआयचं एक पथक गुजरातमधल्या गोध्रा इथं दाखल झालं आहे. गोध्रा इथल्या एका परीक्षा केंद्रावर ५ मे रोजी NEET चा पेपर झाल्यानंतर तीन दिवसांनी तिथल्या पोलीस स्टेशनमध्ये परीक्षेतल्या गैरप्रकाराबद्दल एफआयआर नोंदवण्यात आला होता. गोध्रा पोलिसांनी या प्रकरणात ३० विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी मदत केल्याच्या आरोपाखाली आतापर्यंत पाच आरोपींना अटक केली आहे.

<><><><><>

पुण्यातल्या अंमली पदार्थ प्रकरणात आतापर्यंत ९ जणांवर गुन्हा दाखल झाला असून ८ जणांना अटक करण्यात आली आहे. त्यांना न्यायालयानं २९ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. अंमली पदार्थांचं सेवन करणाऱ्या मुलांचा पुणे पोलिस शोध घेत आहे. याप्रकरणी हलगर्जीपणा आणि लक्ष ठेवण्यात दिरंगाई केली म्हणून दोन अधिकारी आणि दोन अमलदारांचं निलंबन केल्याची माहिती पोलिस उपायुक्त संदीप गिल यांनी दिली आहे.

<><><><><>

केरळ राज्याचं नाव केरळम् असं करण्याचा प्रस्ताव केरळच्या विधानसभेत आज एकमताने संमत झाला. मुख्यमंत्री पिनराई विजयन यांना मांडलेला हा प्रस्ताव आता केंद्रसरकारकडे पाठवण्यात येईल. यापूर्वी गेल्या ऑगस्टमधे असा प्रस्ताव केरळ विधानसभेने संमत केला होता मात्र काही त्रुटी राहिल्यामुळे तो बारगळला होता. त्यामुळं हा नवीन प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.

<><><><><>

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात येत्या बुधवारी सुनावणी होणार आहे. कथित मद्य धोरण प्रकरणात जामीन प्रकरणी उच्च न्यायालयानं निकाल राखून ठेवला होता. तसंच विशेष न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली होती. त्याला केजरीवाल यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे.

<><><><><>

दक्षिण कोरियाची राजधानी सेओलमधल्या एका लिथियम बॅटरी उत्पादक कंपनीला आज लागलेल्या आगीत वीस जणांचा मृत्यू झाला आहे. तर २३ जण अजूनही बेपत्ता आहेत. बॅटरीची तपासणी आणि पॅकिंग केली जात असलेल्या मजल्यावर लागलेली आग गोदामात पसरल्यानंतर मोठ्या प्रमाणात स्फोट झाल्याचं इथल्या अधिकाऱ्यांनी सांगितलं. आग लागली त्यावेळी कंपनीत ६७ कामगार काम करत होते.

<><><><><>

जगभरातल्या देशांमध्ये महिलांची राजकीय क्षेत्रातली संख्या समाधानकारक नसल्याचं संयुक्त राष्ट्रानं आपल्या अहवालात म्हटलं आहे. जगातल्या ११३ देशांपैकी फक्त २६ देशांमध्ये महिला राष्ट्राचं प्रतिनिधित्व करत आहेत. २३ टक्के महिला या देशांमध्ये महत्त्वाच्या राजकीय पदांवर आहेत. तर १४१ देशांमध्ये फक्त तीन पदांवरच महिला नेत्या आहेत. जगातल्या ७ देशांच्या मंत्रिमंडळात एकही महिला प्रतिनिधी नसल्याचंही या अहवालात म्हटलं आहे.

<><><><><>

टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या सुपर ८ मधल्या आजच्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात भारताची सुरुवात खराब झाली. दुसऱ्याच षटकात

सलामीवीर विराट कोहली शून्य धावांवर बाद झाला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा २ षटकात भारताच्या १ बाद ६ धावा झाल्या होत्या.

बार्बाडोसमधे सेंट लूसिया इथल्या डॅरेन सॅमी मैदानावर हा सामना सुरू आहे. ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.